| | |
|---|---|
| ११ | **शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर यांच्या आढावा बैठकांच्या आयोजनाबाबत.** |
| | शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ अंतर्गत शैक्षणिक क्षेत्राशी निगडित पुणे, सोलापूर व अहमदनगर हे तीन जिल्हे येतात. या जिल्ह्यात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकांचे आयोजन कार्यालयीन स्तरावर करण्यात येते.<br>अशा बैठकांचे आयोजन करताना तीनही जिल्ह्यांना लेखी पत्र देऊन त्यासोबत विषयपत्रिकाही दिली जाते. या विषयपत्रिकेत शासनास, संचालनालयास व या कार्यालयास आवश्यक असणाऱ्या माहितीची मागणी करणाऱ्या प्रपत्रांचा समावेश करण्यात येतो. तसेच शासन, संचालनालय व या कार्यालयीन स्तरावर जिल्ह्यांकडून माहिती न आल्याने प्रलंबित असणाऱ्या विषयांचाही समावेश या विषयपत्रिकेत करण्यात येतो. आढावा बैठकांच्या आयोजनाच्या दिवशी प्राप्त माहितीचे संकलन केले जाते. तसेच याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना काही अडचणी किंवा शंका असल्यास त्याचेही निराकरण शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेमार्फत करण्यात येते. |